शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं.२४/२०२३**

श्रीमती मेघा अविनाश पानसरे
रा.१७, आयडियल सोसायटी,
सागरमाळ, कोल्हापूर ४१६००८ } तक्रारदार

**विरूध्द**

१. आस्थापना विभाग,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

२. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर. } वि. प

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील विदेशी भाषा अधिविभागाकडील सहा.प्राध्यापिका श्रीमती मेघा अविनाश पानसरे यांनी दि.२०/०५/२०२३ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात ट्रांन्सलेटर इन रशियन लॅंग्वेज या पदावर दि. १३/०४/१९९२- दि.१०/०३/२००८ अशी सलग १५ वर्ष सेवा कली तिथेच दि.११/०३/२००८ रोजी अधिव्याख्याता पदावर रूजू झाले. मागील सेवेची सेवापुस्तीका व संबधित कागदपत्रे विद्यापीठास मिळत नाहीत. त्यामुळे २०१६ पासून वारंवार मागणी करूनही मला ती मिळत नाहीत. ती मिळावी व त्याची नोंद नव्या पदावरील सेवापुस्तकेत करून मिळावी. अधिव्याख्याता पदावर २००८ साली रूजू झाल्याने पेन्शन लाभ मिळत नाहीत. त्यासाठी मागील सेवेची नोंद घेवून पेन्शन लाभासाठी योग्य ती कार्यवाही करून लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावावा.

**विद्यापीठाचा अभिप्राय :**

१. डॉ.मेघा अविनाश पानसरे हया दिनांक १३/४/१९९२ ते दि.१०/०३/२००८ कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठात भाषातंरकार रशियन भाषा या पदावर एकत्रित मानधनावर कार्यरत होत्या. त्यांनी राजीनामा दिल्यावरून त्यांना सदर पदावरून दि.१०/०३/२००८ रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे.

२. डॉ.श्रीमती मेघा अविनाश पानसरे यांनी धारण केलेले पद हे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ६ व्या पंचवार्षीक योजनेमधून निर्माण करण्यात आले होते. योजना कालावधीनंतर दि.०१/०४/१९८८ पासून सदर पदाची जबाबदारी राज्य शासनाने घेतली असल्याबाबत शासन दि.१३/०२/१९८४ अन्वये कळविण्यात आले असल्याचे दिसून येते. सदर पदासाठी त्यांना शासन अनुदानातून रक्कम रू.१५००/- व नंतर विद्यापीठाच्या स्वनिधीमधून दि.०१/४/२००३ पासून त्यामध्ये आणखी रक्कम रू.६५००/-ची वाढ करून एकूण एकत्रिक वेतन रू.८०००/- दिले जात होते.

३. शिवाजी विद्यापीठासाठी नियमित शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध दि.०६/०७/२००९, दिनांक १३/१०/२००९ व दि.२४/०२/२००९ अन्वये निश्चित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये भाषांतरकार रशियन भाषा या पदाचा समावेश नाही.

४. डॉ.श्रीमती मेघा पानसरे या दिनांक ११/०३/२००८ रोजी सरळसेवेद्वारे विदेशी भाषा अधिविभागात वेतन अनुदानित पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक पदावरील पदोन्नतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्याबाबतची अंतिम मान्यता अप्राप्त आहे.

५. शासन निर्णय क्रं. अनियो-१००५/१०२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये दि. ०१/११/२००५ पासून नवीन परिभाषीत अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. सध्या सदर योजनेचे रूपांतर राष्ट्रीय परिभाषीत अशंदान निवृत्ती वेतन योजनेत करण्यात आले आहे.

६. डॉ.श्रीमती मेघा अविनाश पानसरे या दिनांक ११/०३/२००८ रोजी नियमित सेवेत रूजू झाल्या असल्यामुळे त्यांना शासन निर्णय क्रमांक अनियो-१००५/१०२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

७. डॉ.श्रीमती मेघा अविनाश पानसरे यांची दि.१३/०४/१९९२ ते दि.१०/०३/२००८ कालावधीमधील सेवा ही भाषांतरकार रशियन भाषा या पदावर एकत्रित मानधनावरील होती. सदर पदासाठी शासनाकडून फक्त रक्कम रू.१५००/- मंजूर होते. विद्यापीठाने त्यामध्ये स्वनिधीमधून आणखी रक्कम रू.६५००/-ची वाढ करून दि.०१/०४/२००३ पासून एकत्रित वेतन रू.८०००/-दिले आहे. सदर सेवेत त्यांची वेतननिश्चिती झाल्याचे तसेच मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे कडून त्यांना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक दिल्याचे व दरमहा वर्गणी कपात झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांची सदरची कंत्राटी सेवा वेतन अनुदानाखालील नियमित स्वरूपाची

शिवाजी ... निव

असल्याची पुष्टी होत नाही. सदरची सेवा ही निवृत्तीवेनार्ह आस्थापनेवरील नसल्यामुळे शासन परिपत्रक क्रमांक अनिंयो १००६/८७/सेवा ४, दिनांक १२/०१/२००७ नुसार त्यांना डीसीपीएस क्रमांक देण्यात आला आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने केलेली कार्यवाही बरोबर आहे.

८. त्यांच्या विनंती वरून त्यांच्या कंत्राटी सेवेतील सेवापुस्तकाचा शोध घेतला असता आढळ होत नाही. याबाबत आणखी असे की, विद्यापीठात कंत्राटी, हंगामी, रोजंदारीवर काम करणा-या शिक्षकेत्तर सेवकांचा सेवापट जतन करण्याची प्रथा नाही. तसेच अशी तरतूद असल्याचा आढळ होत नाही. सबब वरील निवेदन मान्य होवून डॉ.पानसरे यांचा अर्ज निकाली काढण्यात यावा.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुत तक्रारीत तक्रारदारांनी सहाय्यक प्राध्यापक पदावर रुजू होण्यापूर्वीची सेवेची सेवा पुस्तिका मिळावी व ती जोडून मिळण्याबद्दल आदेश व्हावेत याकरिता दाखल केलेली आहे.

प्रस्तुत अर्जाबाबत विद्यापीठातर्फे उपकुलसचिव हजर होऊन खालील म्हणणे मांडलेले आहे. सोबत त्यांनी औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे अर्जदार यांनी दाखल तक्रारीची कागदपत्रे व त्यात वेळोवेळी पारित केलेले निकालाच्या प्रती सादर केलेल्या आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २१.०३.२०२४ रोजी घेण्यात आली. तक्रारदारातर्फे स्वतः तक्रारदार तर विद्यापीठ प्रशासनातर्फे आस्थापना विभागाचे उपकुलसचिव डॉ.व्ही.जे.ढेरे हजर होते. या समितीचे एक सदस्य कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांना ते विद्यापीठ प्रशासनाचे प्रतिनिधीत्व करतात या कारणाकरीता या सुनावणीमध्ये सहभाग घेऊ देण्यात आला नव्हता आणि त्यांनी देखील सहभाग घेतला नाही आणि ते या निर्णय प्रक्रियेचा भागदेखील नाहीत ही बाब आवर्जून नमूद करण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, दिनांक ११.०३.२००८ या तारखेपासून सलगपणे तक्रारदार विद्यापीठामध्ये अधिव्याख्याता रशियन भाषांतरकार म्हणून आजतागायत कार्यरत आहे आणि आणि आता त्या सहयोगी प्राध्यापक म्हणून आणि प्रभारी विदेशी भाषा विभागप्रमुख म्हणून विद्यापीठामध्ये कार्यरत आहेत आणि त्या पदाचे सर्व लाभ त्यांना लागू आहेत. त्या पदाकरिता आवश्यक असणारे आणि विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांना लागू असणारे परिनियम क्रमांक २८० अन्वये आवश्यक असणारी सेवापुस्तिका सुरु करण्यात आलेली असून ती अद्ययावत आहे याबाबत कोणताही उजर नाही. तक्रारदाराची मागणी त्यांनी केलेल्या दिनांक १०.०३.२००८ पूर्वीची रशियन भाषांतरकार या स्वनिधीमधील पदावर केलेल्या कामाबद्दल आहे. त्या सदर पदावर दि. १३.०४.१९९२ पासून दिनांक १०.०३.२००८ पर्यत कार्यरत होत्या ही बाब सर्व मान्य आहे. सदरचे पद हे पूर्णतः शिक्षकेत्तर आणि

विद्यापीठ ... गार ...रण ...ती ...पूर.

हंगामी स्वरुपाचे होते ही बाबदेखील उभयपक्षी मान्य आहे. तक्रारदारांचे म्हणणे असे आहे की, सदर हंगामी पदावर जवळपास १५ वर्षे ११ महिने काम केल्यामुळे त्यांना या पदावर स्थायी नेमणुकीचा हक्क प्राप्त होता. त्यामुळे त्यांना सदर पदाकरिता अनुज्ञेय असणारे सर्व लाभ, सेवापुस्तिकेचा लाभ मिळणेदेखील क्रमप्राप्त आहे. तसेच ही सलग सेवा, त्यांचे निवृत्तीवेतन निश्चिती करिता विचारात घेणेदेखील आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठ कायदा १९७४ खाली नेमून देण्यात आलेल्या प्रमाणसंहितमधीले कलम ९ अंतर्गत सेवापुस्तिकेबद्दल प्रावधान करण्यात आलेले आहे. त्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकीनंतर कुलसचिव किंवा प्राचार्य किंवा सक्षम अधिका-यांनी प्राधिकृत केलेली कोणतेही अधिकारी नमुना क्रमांक ४ मध्ये प्रत्येक कर्मचा-यांचे जो कायमस्वरुपी पदावर नेमला गेला असेल अशा नमुना ४ मध्ये सेवापुस्तिका तयार करेल. परंतु केवळ अस्थायी/हंगामी पदावर नेमणुक झालेल्या कर्मचा-यांची सेवापुस्तिका तयार करण्यात येणार नाही. अशी स्पष्ट तरतूद प्रमाणसंहितेमध्ये होती. अशा अस्थायी/हंगामी पदावर कितीही वर्षे काम केले तरीही हा कालावधी सेवापुस्तिका सुरु करण्याकरिता महत्वाचा आहे असे दिसून येत नाही. अस्थायी/हंगामी पदावर काम करणा-या कर्मचा-यांची सेवापुस्तिका तयार करु नये असा अर्थ त्याच्यातून गर्भित होतो.

एखादया कायमस्वरुपी पदावर अस्थायी/हंगामी स्वरुपात नेमणुक झालेल्या कर्मचा-याला त्यांनी पार पाडलेल्या कर्तव्याच्या कालावधीसंदर्भात कायमस्वरुपी कर्मचारी गृहित धरावे असे कायद्याचे गृहितके आहेत. परंतु एखाद्या अस्थायी/हंगामी पदावर केवळ केलेल्या सेवेच्या कालावधीमुळे ते पद स्थायी स्वरुपाचे किंवा कायमस्वरुपाचे समजले जावे असे गृहीतक कायद्याला अभिप्रेत नाही. अशा कायद्याच्या तरतूदी तक्रारदारांनी वारंवार संधी देऊनदेखील या समितीच्या नजरेला आणून दिलेल्या नाहीत. आज रोजी तक्रारदारातर्फे मा. उच्च न्यायालय, मुंबई Deputy Conservator of Forest, Nashik V/s. Nashik Zilla Van Shramik Sangh या २०२४ (२) मधील M.H. L.J.59 या निकालाचा आधार घेण्यात आला. त्यामध्ये असे दिसून येते की, The Supreme Court has observed that the employees had been exploited by the Corporation for years together by engaging them on piece rated basis and it was too late in the day for the Corporation to urge that the procedure for recruitment had not been followed and that consequentially its employees could not be given status and privileges of permanency. In the present case, the workmen had been recruited without there being any recruitment rules in place. The petitioners had extracted work form them for years together without bothering whether their appointments fulfilled the conditions for recruitment. The unlawful acts for the Petitioners in appointing employees for years together as

casual and temporary workmen without affording them the benefits of permanency cannot be permitted to be perpetuated when the MRTU and PULP Act has been enacted specifically to prevent such eventualities and to prohibit unfair labour practices.

As stated earlier, permanency cannot be denied to a workman on the specious contention that there are no sanctioned posts. This is because the MRTU and PULP Act provides that denying a workman the status and privileges of a permanent workman for years together amounts to an unfair labour practice.

या समितीच्या नम्र मतानुसार, वर नमूद केलेले कायदयाचे सूत्र या प्रकरणातील तथ्याला लागू पडत नाही. कारण मा. उच्च न्यायालयासमोरील तथ्यामध्ये देखील कामगार एक प्रकारे कायमस्वरुपी काम करीत होता. दुसरे असे की, त्या प्रकरणातील कामगार हा औद्योगिक कायदयानुसार कामगार या संज्ञेखाली बसत होता. अधिव्याख्याता म्हणून किंवा रशियन भाषांतरकार म्हणून कार्यरत असताना तक्रारदार कामगार या व्याखेत कधीही बसत नव्हते. तक्रारदारातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्याच्या तर्फे औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे एक प्रकरण दाखल करण्यात आले होते व त्या निकाला आधारे काहीं आदेश पारित झाले होते व त्या नुसार तक्रारदार हे कामगार या व्याखेत येत होते. विद्यापीठ प्रशासनातर्फे हे दाखवून देण्यात आले की, औद्योगिक न्यायालयाचा तो निकाल मा. उच्च न्यायालय, मंबई यांच्यासमोर आक्षेपित झाला होता. (Writ Petition 1197/1999) व ती याचिका दिनांक १८/११/२००५ रोजी औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांच्याकडे पुर्ननिर्णयाकरिता न्यायालयीन कार्यकक्षेच्या मुद्दयांवर निर्णय घेण्याकरिता परत पाठविण्यात आली होती आणि त्यानंतर ते प्रकरण औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांनी तक्रारदार गैरहजर म्हणून दिनांक १९/०८/२००६ रोजी काढून टाकले. याचा अर्थ असा आहे की, तक्रारदार औद्योगिक कायदयाखाली कामगार आहे किंवा नाही याचा अंतिम निर्णय सक्षम न्यायालयाने दिलेला नाही. सबब, तक्रारदारांनी आज रोजी भिस्त ठेवलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा त्यांना उपयोग होऊ शकत नाही. तक्रारदारांची या अर्जात केलेली मागणी ही योग्य व रास्त नाही. तिला कायदयाचा पाठिंबा नाही. सबब, ती मान्य करता येत नाही. तसेही पाहता अधिव्याख्याता म्हणून दि.११/०३/२००८ पासून काम करीत असताना तक्रारदारांची सेवापुस्तिका सुरु करण्यात आलेली आहे. तक्रारदारांना नवीन अंशदान परिभाषित निवृत्तीवेतन योजना लागू आहे. त्यांचे कोणतेही आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाही. त्यामुळे त्यांना कोणताही आदेश या समितीकडून मिळण्यास त्या पात्र नाहीत, या निष्कर्शाला ही समिती आलेली असून ही तक्रार खारिज करण्यास पात्र आहे असा या समितीचा निष्कर्श आहे. सबब ही समिती खालील आदेश पारित करित आहे.

विद्यापीठ ...कार ...वारण ...िती ...ल्हापूर.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

आदेश

सदरची तक्रार खारिज करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 04 APR 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)